# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांचे कार्यालय

क्र.कावि/कक्ष-१४/सानि/ले.ली./२८०/२०१७
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक - 23 /०८/२०१७

## फेर ई-निविदा सूचना - २०१७
(दुसरी वेळ)

बुलडाणा जिल्हयातील १. प्रारुप मतदार यादी २. निरंतर पुनर्रिक्षण कार्यक्रमातंर्गत तयार होणारी पुरवणी इत्यादी आवश्यकतेनार छपाई करणेसाठी विहीत नमून्यातील ई-निविदा प्रणाली द्वारे फेर निविदा मागविण्यात येत आहे.

कामाचे नाव - बुलडाणा जिल्हयातील मतदार यादी व निवडणुक विषयक ईतर छपाई करणेबाबत फेर ई-निविदा

| | |
|---|---|
| निविदा फार्म फी | रु ३०००/- |
| इसारा रक्कम | रु ५०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रु १,००,०००/- |
| निविदा प्रसिद्ध करणे | दि.२४/०८/२०१७ सकाळी १०.०० वाजता |
| निविदा उपलब्ध कालावधी | दि. २४/०८/२०१७ ते दि.१/०९/२०१७<br>सकाळी १०.०० ते दूपारी ५.०० पर्यंत |
| प्रि-बिड मिटींग | दिनांक २८/०८/२०१७ दु. १२.०० वाजता |
| सपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, बुलडाणा जिल्हा .<br>E-mail ID : dydeobuldhana@gmail.com<br>फोन क्रं ०७६२- २४३११६ |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | दि.०४/०९/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता<br>जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांचे दालनात |

टिप- १. सुक्ष्म व लघु, मध्यम उदयोग विकास अधिनियम-२००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उदयोगांना निविदा शुल्क व बायाना रक्कम भरण्यापासून सुट देण्यात येत आहे.
२. पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थाना / लोकसेवा केंद्रांना बायाना रक्कमेत सुट देण्यात येत आहे.

23 8 17
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी,बुलडाणा

## जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,बुलडाणा यांचे कार्यालय
## (निवडणूक शाखा)

---

**कामाचे नाव - बुलडाणा जिल्हयातील मतदार यादी व निवडणुक विषयक ईतर छपाई करणेबाबतची फेर ई-निविदा**

बुलडाणा जिल्हयातील १. प्रारुप मतदार यादी २. निरंतर पुनर्रिक्षण कार्यक्रमातंर्गत तयार होणारी पुरवणी यादी छपाई करणे ३. ए ४ व लीगल साईज ची छपाई करणेसाठी आवश्यकतेनुसार A४/Legal Size पेपरवर करणेकरिता विहीत नमून्यातील ई-निविदा प्रणाली द्वारे फेरनिविदा मागविण्यात येत आहे. या कामासाठी खाली नमूद केलेल्या अटी /शर्ती लागू राहतील.

### अटी व शर्ती

१. ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०१/०९/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदा स्विकृत केल्या जातील. प्राप्त निविदा दि.०४/०९/२०१७ रोजी सकाळी १२.०० वाजता जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलडाणा जिल्हा यांचे समक्ष उघडण्यात येतील.

२. निविदा शुल्क ३००० व ईसारा रक्कम रु.५०,०००/- महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध online पेमेंट विक्लपाव्दारे भरावे.

३. सुक्ष्म व लघु, मध्यम उदयोग विकास अधिनियम-२००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उदयोगांना निविदा शुल्क व बायाना रक्कम भरण्यापासून सुट देण्यात येत आहे.

४. पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थाना / लोकसेवा केंद्रांना बायाना रक्कमेत सुट देण्यात येत आहे.

५. **ई-निविदेत खालील कागदपत्रांच्या प्रती अपलोड करणे आवश्यक आहे.**

   I. कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयात काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र. तसेच केलेल्या कामाचा कार्यारंभ आदेश व काम समाधानकारकरित्या केल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

   II. सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र.

   III. पॅन कार्डची प्रत.

   IV. नोंदणी प्रमाणपत्र (गुमास्ता लायसेंस) नुतनीकरणासह.

   V. विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र व वॅट नोंदणी प्रमाणपत्र

   VI. विक्री कर, वॅट व सेवाकर भरल्याचे विवरणपत्र तसेच सन २०१५-१६चे विक्रीकर नादेय प्रमाणपत्र

   VII. संस्थेची/फर्मची मागील तीन वर्षामध्ये २०१४-१५, १५-१६, १६-१७ एका आर्थिक वर्षाची उलाढाल किमान १५,००,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक राहील. चार्टड ऑकाऊंट (सी.ए.) यांनी प्रमाणित केलेले असावे.

   VIII. GST Registration Certifacate

   IX. काळ्या यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

   X. निविदेधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्पवर नोटरी / कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र.

   XI. सदर निविदेकरीता निविदाधारकाचे upload केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र

XII. शासकिय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना तसेच सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात येत आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ / महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडुन अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील.

XIII. पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थाना / लोकसेवा केंद्रांनी पंजीकृत असल्याबाबत व बयाणा रक्कम सुट असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

वरिल सर्व कागदपत्रे अधिकृतरित्या प्रमाणित केलेली असावीत. सर्व कागदपत्रे ही स्कॅन करुन Online भरण्यात यावीत. उक्त कागदपत्रे ही Online अपलोड न केल्यास निवदेचा विचार केला जाणार नाही.

६. लिफाफा अ (तांत्रिक लिफाफ्यातील) अटी व शर्ती पुर्ण करणा-या निविदाधारकाच्या दराचा लिफाफा ब (व्यापारी दरपत्रकाचा लिफाफा) उघडण्यात येईल.

७. लिफाफा ब मध्ये पीडीएफ सीडी वरुन प्रती पृष्ठ कागदासह एका बाजुचा छपाई दर नमुद करावा मतदार यादीची छपाई झाल्यावर विधानसभा मतदार संघनिहाय तसेच यादीभाग निहाय स्टॅपलींग/बाईंडिंग करुन तसेच विहित नमुन्यातील कव्हरपेज लावून संपुर्ण मतदार यादीचा सेट तयार करणे व अशा ७ विधानसभा मतदारसंघ निहाय आदेशातील नमुद संख्येचे सेट,लावण्यासाठी लागणा-या कागद व इतर खर्चासह छपाई दर नमुद करावे.

८. मतदार यादया दोन्ही बाजूने छापाई करणे आहे.

९. छपाईसाठी ८० जीएसएम व A४ साईजचा कागद वापरावयाचा आहे.

१०. छपाईकरिता चांगल्या प्रतीचा कागद वापरणे आवश्यक राहील. निकृष्ट प्रतीचा कागद अगर छपाईचे काम निकृष्ट स्वरुपाचे, दोषपूर्ण आढळुन आल्यास असे साहित्य स्विकारले जाणार नाही व अशा स्वरुपात होणा-या कोणत्याही नुकसानीस निविदाधारक स्वतः जबाबदार राहतील.

११. ज्या ठेकेदाराला काम मंजुर करण्यात येईल त्यांना कामाचा आदेश देणेपूर्वी त्यांचेकडुन रक्कम रुपये १००/- रुपयाच्या बॉड पेपरवर अटी व शर्तीसह बंधपत्र लिहुन घेण्यात येईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कम रुपये १,००,०००/- (रु एक लाख फक्त) चा राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष उपजिल्हा निवडणुक अधिकारी,बुलडाणा (Deputy District Election Officer, Budlana ) यांचे नावे देणे आवश्यक आहे.

१२. निविदाधारकास अदा करण्यात येणा-या रक्कमेवर नियामानुसार GST कर व आयकर तसेच शासनाचे लागू असलेले इतर कर कपात करण्यात येईल.

१३. छपाई केलेल्या कामाची पडताळणी केली जाणार असल्याने पडताळणीच्या वेळी चुकीची/अस्पष्ट/खराब छपाई असलेल्या प्रती पुन्हा विनामुल्य करुन द्याव्या लागतील.

१४. प्रारुप मतदार यादी व निंरतर प्रक्रियेतील मतदारांची पुरवणी यादी पुनर्रिक्षण कार्यक्रमापुर्वी छपाई करणे बंधनकारक आहे. तसेच इतर तत्सम छपाईची कामे वेळोवेळी दिलेल्या मुदतीत छपाई करुन देणे बंधकारक राहील.

१५. छपाई केलेल्या मतदार याद्या तसेच वेळोवेळी छपाई केलेली कामे ठेकेदाराने स्वतः स्वखर्चाने वाहतुक करुन जिल्हा कार्यालयात पोहचविणे आवश्यक राहील.

१६. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी ठेका मर्यादित असेल.

१७. छपाई कामाचे देयक जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी,बुलडाणा यांचे नावे सादर करावयाचे असुन काम समाधानकारक व बिनचुकरित्या पुर्ण झाल्यानंतर तसेच केलेल्या कामाची पडताळणी केल्यानंतर देयकाची रक्कम अदा केली जाईल.

१८. मंजुर निविदाधारक कामे करण्यास असमर्थ ठरल्यास इतर कोणत्याही ठेकेदाराकडुन काम करुन घेण्यात येईल व जादा खर्च झाल्यास तो संबंधित ठेकेदाराकडुन वसुल करण्यात येईल.

१९. निविदाधारकास इतर कोणत्याही शासकीय कार्यालयाने प्रतिबंधित (Black Listed) केले असल्याचे आढळुन आल्यास अशा निविदाधारकास निविदा प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

२०. निविदा मंजुर करणे अगर नाकारणे आवश्यक वाटल्यास विभागुन देणे शर्ती बदलणे हे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी बुलडाणा यांनी राखुन ठेवलेले आहेत.

२१. विहित मुदतीत काम पुर्ण न केल्यास दर दिवशी रक्कम रुपये ५०००/- दंड आकरण्यात येईल.

२२. वरील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास निविदाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहतील तसेच त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

२३. प्राप्त निविदा कोणतेही कारण न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलडाणा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहे.

23.8.17

जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी,बुलडाणा.

# <u>निविदाधारकाने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्राचा नमुना</u>

प्रति,
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणुक अधिकारी बुलडाणा**

मी याद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा(**सामान्य निवडणूक विभाग**) यांनी बुलडाणा जिल्हयातील मतदार यादी व निवडणुक विषयक ईतर छपाई या कामाकरीता आमंत्रित केलेल्या ऑनलाईन निविदा प्रक्रीयेमधे तांत्रिक/व्यापारी लिफाप्यात माझी निविदा सादर करीत आहे.
निवीदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्यास मी बांधील आहे.

मी याद्वारे प्रतिज्ञा करतो की, मी सादर केलेली निविदा मंजुर झाल्यास निवीदेतील कामकाज मी विहित मुदतीत योग्य रीतीने पार पाडेन व या कामकाजासाठी आवश्यक साहीत्य/मनुष्यबळ उपलब्ध करुन देईन. तसेच मी निवीदेद्वारे जे शासकीय काम देण्यात येईल त्याबाबत पुर्णत: गुप्ततेची हमी घेत आहे..मा.जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे लेखी सुचनेनुसार काम करणे बंधनकारक राहील. तसेच स्वीकृत केलेल्या निवीदेचा अंतिम दर हा मा.जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या मान्यतेस अधिन राहुन व त्यांनी मंजुर केलेला दर मला मान्य राहील.
मला हयाबाबत पुर्ण कल्पना आहे की, माझया कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर / दिरंगाई झाल्यास जिल्हाधिकारी निश्चीत करतील अशा दंडास मी पात्र राहीन.

निविदा धारकाची स्वाक्षरी

1. निविदा ज्यांकडुन दाखल करण्यात आल्या त्या संस्था / उदयोगाचे नाव व पत्ता :-
   ------------------------------------------------------------------------
   ----------------------------

2. निविदा धारकाचे संपुर्ण नाव व पत्ता :- -------------------------

   दुरध्वनी क्रमांक :-
   मोबाईल क्रमांक :-
   साक्षीदार :-

   **1. ----------------------------------------------------रा.--------------------**
   **(स्वाक्षरी)**
   **2. --------------------------------------------------- रा.--------------------**
   **(स्वाक्षरी)**

# <u>निविदाधारकाने सादर करावयाचेस्वयंघोषणापत्रनमुना</u>

मी ---------------------------------------------------- रा. ------------------------------ वय ---------

सत्यप्रतिज्ञेवर लिहुन देतो की, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा(**सामान्य निवडणूक विभाग)** यांनी बुलडाणा जिल्हयातील मतदार यादी व निवडणुक विषयक ईतर छपाई या कामाकरीता ई-निविदा सुचना सन 2017 करिता ------------------------------------------------------ या फर्मने निविदा सादर केलेली असुन सदर निवीदेकरीत मी www.mahatenders.gov.in या ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड केलेले सर्व कागदपत्रे / माहिती खरी असुन सदर कागदपत्रे व माहिती खोटी आढळल्यास भा.द.वि कलम 199, 200 अन्वये मी शिक्षेस पात्र राहील.

ठिकाण:-

दिनांक :   /   /2017

**स्वघोषणापत्र करणाराची सही व नाव**

**साक्षीदाराची सही :- ------------------------------------------------------**

**नाव :- ---------------------------------------------------------------------**

**पत्ता :- --------------------------------------------------------------------**